लोकमत

महासंचालक गजभिये यांची माहिती : ई-बार्टी ॲपसह यू ट्यूबच्या माध्यमातून प्रशिक्षण

# कोरोना महामारीत बार्टीचे कामकाज झाले हायटेक..!

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) वतीने विविध योजना आणि उपक्रम राबविले जातात. कोरोनामुळे यात खंड पडू नये, यासाठी यू ट्यूब आणि ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन कामकाज सुरू असून, विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच राज्यात प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येणार आहे. या माध्यमातून सामाजिक न्यायाबाबतचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची माहिती बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांनी दिली.

बार्टीच्या माध्यमातून अनेक लोककल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यात स्पर्धा परीक्षा तयारी, संशोधनासाठी अधिछात्रवृत्ती, कौशल्य विकास, समतादूत, प्रकाशन, जातपडताळणी अशा विविध प्रकारचे काम केले जाते. समाजकल्याण विभागाच्या विविध योजना आणि उपक्रम जनतेपर्यंत पोहचले पाहिजेत, तसेच सामाजिक समता प्रस्थापित व्हावी, यासाठी २००८ पासून हे काम सुरू आहे. आता या कामाची व्याप्ती वाढविण्यात येणार असून, सामाजिक न्यायासंदर्भात प्रशिक्षण देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात बार्टीचे केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरावरील सामाजिक न्याय भवनाच्या परिसरात ही केंद्र असतील. या ठिकाणी प्रशिक्षणासंबंधी सोयीसुविधा असतील. तसेच ग्रंथालय, अभ्यासिका, योजनांची माहिती देणारा कक्ष, जात प्रमाणपत्र पडताळणी सुविधा या ठिकाणी असणार आहे.

महासंचालक गजभिये यांनी सांगितले की, सामाजिक न्यायाच्या कक्षा रुंदावण्यासाठी ई-बार्टी ॲप तयार करण्यात आला आहे. विद्यार्थी, संशोधक, लाभार्थी या ॲपच्या माध्यमातून सातत्याने बार्टीच्या संपर्कात राहील. यात संशोधन, ई-क्लास रूम, ई-लायब्ररी, बार्टी बुलेटिन, पेमेंट गेटवे, हेल्प डेस्क तसेच ई-व्हॅलिडिटी अशी सुविधा असेल. त्याचप्रमाणे जातपडताळणी प्रक्रिया सुलभ आणि सुसह्य होण्यासाठी ई-जात वैधता प्रमाणपत्र सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्जदाराच्या सोयीसाठी महाराष्ट्र शासनाच्या निर्णयासह परिपत्रक, प्रवर्गनिहाय यादीसह ऑनलाइन अर्ज दाखल करण्याबाबतचे मार्गदर्शन आहे. ई-ऑफिसच्या संकल्पनेसह बार्टी आयएसओ प्रमाणकासाठी काम सुरू आहे. आयएसओ नामांकन प्रमाणित करण्याची कार्यवाही सुरू आहे.




येत्या काळात येरवडा येथील प्रशिक्षण केंद्रात इन्क्युबेशन सेंटर सुरु करण्यात येणार असून, याठिकाणी उत्तमोत्तम प्रशिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही गजभिये यांनी सांगितले.

## सरकारी नियमांचे पालन करून सुरक्षेची घेतली जाते काळजी

२०२० मध्ये आलेले कोरोनाचे संकट आजही कायम आहे. मात्र, कोरोनाच्या महामारीतदेखील बार्टीतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सुरक्षेची काळजी घेऊन काम केले आहे. या काळात ऑनलाइन पद्धतीने यू-ट्यूबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. एमसीईडीसोबत व्यापक प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्याबाबत विचार सुरु आहे. तसेच कोरोना आणि लॉकडाऊनमध्ये अनेकांचे रोजगार गेले, त्यामुळे तरुणांना उद्योगांचे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम सुरु असून, त्याला मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांनी सांगितले.